# या जगात देव आहे काय?

प्रा. डॉ. बाबुराव गुरव

निर्मिती संवाद, कोल्हापूर

ज्यांनी सर्वप्रथम देव कल्पना उच्चारली,
ज्यांनी सर्वप्रथम देव कल्पनेला नकार दिला,
जे सतत देव कल्पनेच्या सत्यासत्यतेचा,
गंभीरपणे शोध घेण्याचा प्रयत्न करतात,
त्या सर्वांना प्रेम आदरपूर्वक...

# हात जोडण्यापूर्वी...

या जगात देव आहे काय? या वादग्रस्त विषयावरचे छोटेखानी चिंतन वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. हा विषय अतिशय नाजूक, गुंतागुंतीचा, भावनेचा आणि टोकाच्या मतभेदाचा आहे, याची जाणीव आहे. एखादा माणूस कितीही बुद्धिमान असला, चिंतनशील, प्रतिभासंपन्न असला तरीही तो अशाप्रकारच्या चिरंतन प्रश्नचिन्हाचे निर्णायक, सर्वमान्य उत्तर एकटा शोधू शकेल असे मानण्याइतपत लेखक अपरिपक्व नक्कीच नाही. खरे तर तसे निर्णायक उत्तर देणे हा या लेखनापाठीमागचा हेतू नाही. हे जाणकारांच्या लक्षात येईलच. या विषयावर मानववंशाने सतत लेखन, चिंतन, अभ्यासमंडन, विश्लेषण केले पाहिजे. लोकविज्ञाननिष्ठ, तर्कसंगत, वस्तुनिष्ठपणे हे काम केले पाहिजे. सत्यशोधकाच्या भूमिकेतून केले पाहिजे. जगातील सर्व विषय तर्कन्यायमूलतेच्या कक्षेत अजून आले नाहीत. कदाचित लवकर किंवा केव्हाच येणार नाहीत. असे असले तरी पिढ्यान्‌पिढ्या निर्भय अभ्यासकांनी या विषयावर शक्य तितके स्पष्ट लेखन दोन्ही बाजूने केले आहे. असे करण्यानेच मानववंशाचा विकास होणार आहे असे वाटते.

देव ही सुंदर, उदात्त, मंगल, पवित्र, नैतिक अशी सिद्धांतकल्पना आहे. ज्यावेळी ही कल्पना पहिल्या मानवाला सुचली, त्या काळात ती क्रांतीकारी कल्पना होती. देव कल्पनेने मानववंशाच्या विकासाच्या इतिहासात फार महत्त्वाचे काम केलेले आहे. कालांतराने प्रस्थापित, उच्चवर्णीय, सधन, शोषक, सत्ताधारी वर्गाने देव कल्पनेवर ताबा मिळविला आहे. मूर्ती, मूर्तीपुजा, मंदिरसंस्कृती, कर्मकांडे, पापपुण्य कल्पना, अस्पृश्यता, जातीसंस्था, वर्गव्यवस्था, विषमतेची संस्कृती, शिक्षण, कला, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, रुढी, परंपरा, रितीरिवाज, लोकनिती, शोषणव्यवस्था, संघर्षपद्धती, धर्म, देश, आहार, विहार, मानवी संबंध अशा मानवी जीवनाच्या विविध अंगांवर सर्वस्पर्शी देवकल्पनेचा प्रभाव पडला आहे, संस्कार घडला आहे.